नि.दि.दावा क्र. ५५/२०१७
सुपडू भिल + ९ विरुध्द संतोष भिल+ ५

CNR-MHDH05-001024-2017

<u>निशाणी क्र. ५५ वर आदेश</u>

अर्ज व त्यावरील खुलाशाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी यांनी आजचे कामकाज तहकूब होऊन मिळणेसाठी केला आहे. प्रतिवादी यांचे थोडक्यात कथन की, आज रोजी वादीची उलट तपासणी घेणेवेर तारीख नेमली आहे. परंतु माझे माहितगार वकील श्री. टी.व्ही. पाटील, यांची तब्येत बरी नसल्याने ते आज दावा चालवू शकत नाही. तरी पुढील मुदत मिळावी अशी त्यांनी विनंती केली.

३. सदरच्या अर्जावर वादी यांचेतर्फे हरकत घेण्यात आली. प्रतिवादीस प्रस्तुत अर्ज देणेस कोणतेही कारण घडलेले नाही. अर्जातील नमुद कारण देखील चुकीचे दिसत आहे. प्रतिवादींचे वकील आजारी व या क्षणी न्यायालयात उपस्थित आहे. केवळ दाव्याचे चौकशीचे कामकाज लांबणीवर टाकण्याचे उद्देशाने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत प्रतिवादीस उलट तपास घेणे करीता त्याने मागितलेल्या पुढील संधी बाबत यापुर्वी प्रतिवादीस शास्ती चा आदेश केलेला आहे. सदर शास्तीची रक्कम प्रतिवादी यांनी दिलेली नाही. करीता प्रस्तुत अर्ज

विचारात घेणे योग्य होणार नाही. सबब अर्ज हा जास्तीत जास्त शास्तीवर मंजुर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली.

४. युक्तीवाद ऐकून घेऊन प्रकरणाचे अवलोकन केले. दावा हा वाटणी करीता, घोषित होऊन मिळणे करीता आणि निरंतरच्या मनाई हुकूमाकरीता दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र. ३,४ आणि ५ यांच्या विरुध्द प्रकरण हे एकतर्फा चालविण्यात येत आहे, याबाबत आदेश दिनांक १६.०३.२०२० रोजी करण्यात आला. प्रतिवादी क्र. १ व २ यांची लेखी जबाब अभिलेखवर आहे. त्यानंतर माझे पुर्वाधिकारी यांनी दिनांक १८.०३.२०२१ रोजी प्रकरणात मुद्दे निश्चित केले. यापुर्वी देखील दिनांक ०२.०८.२०२२ रोजी प्रतिवादी यांचा मुदतीचा अर्ज रुपये पाचशेच्या शास्तीवर मंजुर केल्याचा दिसून येतो. तसेच वादी यांचे कथन की, प्रतिवादी यांनी शास्तीची रक्कम अदा केलेली नाही. त्यानंतर आक्षेप घेतल्यानंतर शास्तीची रक्कम अदा केल्याचे दिसून येते.

५. मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू करण्यात आली होती. त्याचा परिणाम हा न्यायालयीन कामाकाजवर देखील झाला होत. न्यायालयीन कामकाज हे मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी पारीत केलेल्या परिपत्रकान्वये सुरू होते. मा. उच्च न्यायालयाच परिपत्रकान्वये कामकाज हे दिनांक ०२.०८.२०२१ पासून पूर्ववत सुरु झाले आहे.

६. दिवाणी प्रक्रीया संहितेचे आदेश १७ हे तहकुबी बाबतचे आहे. यामध्ये तीन वेळेस

तहकुब करावे, या आशयाचा मानद आहे, असे दिसून येते. प्रकरण हे सन २०१७ चे आहे, याची प्रतिवादी यांना जाणीव आहेच, अर्जात प्रतिवादी यांचे विधिज्ञ हे आजारी आहे, असे अर्जात नमुद आहे. विधिज्ञांचे वैयक्तीक आजाराचे कारण पाहता मी अर्ज मंजुर करीत आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारित करतो.

**आदेश**

- अर्ज हा मंजुर करण्यात येतो.
- प्रतिवादी यांना निर्देश देण्यात येते की, त्यांनी या पुढे प्रकरणात कार्यवाही करावी.

Digitally signed by RAJU BHASKAR DOLE
Date: 2022.09.07 17:51:20 +0530

( रा.भा.डोळे )

दिनांक : ०६.०९.२०२२. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, साक्री

: **प्रमाणपत्र:**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – मयुर योगेंद्र जाधव.

न्यायालयाचे नांव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, साक्री.

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक – ०७.०९.२०२२.

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३